## घटक २
# चांदण्यात भिजायचं राहून जाऊ नये, म्हणून!
## (लेख क्र. ११ ते २०) (आशयसूत्रे व वाङ्मयीन विशेष)

### २.१ उद्दिष्ट्ये

या घटकाचे अध्ययन केल्यानंतर विद्यार्थ्यांना,

१. लेखांचा आशय सांगता येईल.

२. डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या लेखनाचे विशेष सांगता येतील.

३. ललित गद्याचे स्वरूप विशेष समजतील.

४. ललित गद्यात्मक लेखन करता येईल.

### २.२ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रहो, डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या 'चांदण्यात भिजायचं राहून जाऊ नये, म्हणून!' या पुस्तकाचा अभ्यास आपण करीत आहोत. हे पुस्तक ललितगद्य या वाङ्मय प्रकारामध्ये मोडते. ललितगद्य या वाङ्मय प्रकाराची संकल्पना आपण पहिल्या विभागामध्ये पाहिली. तसेच चौथ्या विभागामध्ये यासंदर्भातील अधिक विवेचन केले आहे. विद्यार्थ्यांनी ते सर्व समजून घेऊन ललितगद्य या लेखन प्रकारामध्ये कौशल्य मिळविणे अपेक्षित आहे.

प्रस्तुत घटकामध्ये आपण लेख क्र. ११ ते २० मधील आशय व वाङ्मयीन विशेष यांचा अभ्यास करणार आहोत.

### २.३ विषय विवेचन

प्रत्येक लेखाचा आशय सारांशरूपाने पुढीलप्रमाणे -

#### २.३.१ पाणिनीचा मृत्यूही आम्हा शिक्षकांना शिकवून जातो!

'पाणीनि' या महान भारतीय संस्कृत व्याकरणकाराचा 'अष्टाध्यायी' हा ग्रंथ जगद्विख्यात आहे. जगातील सर्व भाषांची व्याकरणं व भाषाशास्त्र यांच्या अभ्यासकांना मार्गदर्शक ठरणारा ग्रंथ म्हणून त्यांची ख्याती आहे. पाणिनीचा व्याकरणाचा अभ्यास, त्याचा व्यासंग, परिश्रम, अध्यापन, एकाग्रता व श्रेष्ठत्व यांचे विवेचन डॉ. आ. ह. साळुंखे यांनी या लेखामध्ये केले आहे.

पाणिनीला व्याकरणाच्या क्षेत्रामध्ये एकमेवाद्वितीय असे जे स्थान प्राप्त झाले, त्याची कारणमीमांसा डॉ. साळुंखे यांनी केली आहे. पाणिनीने व्याकरणाचा अभ्यास करण्यासाठी अपार कष्ट घेतले. विविध

प्रदेशातील, विविध थरांतील लोकांच्या भाषेचे सूक्ष्म निरीक्षण केले. त्यामधून प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण केले, वर्गीकरण केले. त्यातून काही नियम दाखवून दिले, काही अपवाद नोंदविले. नियमांना व्यापकता यावी आणि अपवादांचं सूचनही योग्य रीतीनं व्हावं, म्हणून अनेक क्लृप्त्या-युक्त्या वापरल्या. यामुळे त्याच्या व्याकरणाला विलक्षण सूक्ष्मता लाभली. कात्यायनासारख्यानं 'वार्तिके' नावाचे नियम लिहून त्याच्या काही मर्यादा स्पष्ट केल्या. तरीही त्याच्या क्षेत्रातील त्याचे स्थान सर्वश्रेष्ठ, अबाधित आहे.

पाणिनीची ज्ञानावर किती उत्कट निष्ठा होती, याविषयीची एक कथा डॉ. साळुंखे यांनी उद्धृत केली आहे. पाणिनी एकदा आपल्या विद्यार्थ्यांना 'व्याघ्र' या शब्दाची व्युत्पत्ती समजावून सांगत होता. वाघाला 'व्याघ्र' हा शब्द कसा लावला गेला, याचं स्पष्टीकरण करताना 'व्याजिघ्रति इति व्याघ्रः' असं त्यानं सांगितलं. 'घ्रा' या धातूचा हुंगणं, वास घेणं, असा अर्थ होतो. वाघाला आपल्या सावजाचं अस्तित्व वासावरुन कळतं. तो त्याच्या वासावरुन माग काढत, म्हणजेच हुंगत-हुंगत त्याच्यापर्यंत पोचतो. त्याच्या या कृतीमुळे त्याला 'व्याघ्र' हे नाव मिळाले. पाणिनी ही व्युत्पत्ती सांगत असताना खरोखरच एक वाघ सावजाला हुंगत हुंगत तिथं आला. त्याला पाहताच सर्व विद्यार्थी भिऊन पळून गेले. पाणिनी मात्र व्युत्पत्ती सांगण्यात इतका गुंग झालेला होता की, त्याला वाघ आल्याचं कळलचं नाही. तो व्युत्पत्तीचं विवेचन करीत राहिला आणि वाघानं त्याच्यावर झडप घालून त्याचे प्राण घेतले.

पाणिनीची ही कृती व्यवहारशून्येतेची, वेडेपणाची होती, असे आक्षेप त्याच्यावर घेतले जाऊ शकतील. ही घटना ऐतिहासिक आहे का, हे ही आपण नेमकेपणानं सांगू शकत नाही. पण त्या कथेतून व्यक्त होणारा आशय पाणिनीच्या ज्ञाननिष्ठेचे अजोड दर्शन घडविणारा आहे. पाणिनीसारखी एखाद्या 'वेडा'नं झपाटलेली माणसंचं मानवजातीला ज्ञानाचा नवा प्रकाश देतात. तिचं माणूसपण उन्नत करतात. ज्ञानाचा एक एक कण मिळविण्यासाठी कसं झोकून द्यावं आणि आपल्या विद्यार्थ्यांना शिकवताना बाकीच्या सगळ्या जगाला कसं विसरून जावं, याचा प्रभावी धडा पाणिनीच्या कथेतून मिळतो. त्यामुळे पाणिनी आम्हांस भाषेच्या व्याकरणाबरोबरच उदात्त जीवनाचं व्याकरणही शिकवतो, असे डॉ. आ. ह. साळुंखे म्हणतात.

### २.३.२ एक-एक नवा शब्द जाणणं, म्हणजे एक-एक नवा मित्र जोडणं !

विद्यार्थीदशेमध्ये ज्ञानलालसा कशी असावी, याचे उत्कट चित्रण डॉ. आ. ह. साळुंखे यांनी प्रस्तुत लेखामध्ये केले आहे. त्यांच्या महाविद्यालयातील एका अनुभवाच्या अनुषंगाने त्यांचे चिंतन मांडलेले आहे. एकदा परीक्षेच्यावेळी वर्गावर पर्यवेक्षण करीत असताना डॉ. साळुंखे यांनी एका विद्यार्थ्यांस उत्तरपत्रिकेवर विषयाचे पूर्ण नाव लिहिण्यास सांगितले. त्यावेळी त्या विद्यार्थ्यांने नाराजीने, चिडचिडीने 'आमची मापं काढतायत्!' असे वाक्य उच्चारले. हे ऐकून डॉ. साळुंखे यांचे हृदय विदीर्ण झाले. शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांची चूक त्याला सांगणं म्हणजे त्याची मापं काढणं असा अर्थ लावणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वागणुकीने त्यांच्या मनात विचारांचे काहूर उठले.

विद्यार्थी कसा असावा, याविषयीचे डॉ. साळुंखे यांचे एक स्वप्न आहे. जमिनीत पेरलेलं बी मातीत गप्प बसत नाही. त्याच्यामधील चैतन्य मातीला धडका देऊन अंकुरते. कोवळ्या पानाचं लेणं धारण करीत

आकाशाच्या दिशेने झेपावते. विद्यार्थ्यांनीही आपल्या व्यक्तिमत्त्वावर ज्ञानाची कोवळी पालवी धारण करावी. त्याच्या प्रतिभेचा अंकुर वाढून त्याचा डेरेदार वृक्ष व्हावा. त्यानं रोज नवे-नवे शब्द, नवे-नवे प्रयोग, नवी-नवी प्रमेयं माहीत करुन घ्यावीत. 'आम्हा घरी धन शब्दाचीच रत्ने' असं संत तुकारामांनी म्हटलं आहे. विद्यार्थ्यांना एक एक नवा शब्द हा एकेका मौल्यवान रत्नाच्या प्राप्तीसारखा वाटावा. एक एक शब्द जाणणं म्हणजे एक एक नवा मित्र जोडणं, असं मानायला हवं. नवे शब्द आत्मसात करणं म्हणजे जणू काही लोकसंग्रह वाढवणं अस वाटायला हवं. एखाद्या नव्या शब्दाच्या बारीक सारीक अर्थच्छटा ध्यानात ठेवाव्यात. अशा रीतीने स्वत:ला समृद्ध करावे असे डॉ. आ. ह. साळुंखे यांनी म्हटले आहे.

### २.३.३ पोहायला शिकायचं असेल, तर पाण्यात उतरलचं पाहिजे !

प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वामध्ये सुप्त स्वरूपात प्रचंड आत्मशक्ती असतात. जबरदस्त निर्मितीक्षमता असते. परंतु या सर्व सामर्थ्याच्या आधारे अपेक्षित नवनिर्मिती होताना आढळत नाही, याविषयीचा एक अनुभव डॉ. आ. ह. साळुंखे यांनी प्रस्तुत लेखामध्ये नोंदविला आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड या गावी एका कार्यक्रमानिमित्त डॉ. साळुंखे गेले होते. पोलादपूरच्या पुढे गेल्यावर एका ठिकाणी ४०-४५ वर्षाची एक महिला व पंधरा-सोळा वर्षांची एक मुलगी बसमध्ये चढली. त्यांचा तिकिटाचा व्यवहार पूर्ण करण्यामध्ये सुट्ट्या पैशांचा अडथळा येत होता. त्यामुळे बस थांबल्यावर वाहकाने त्यांना एका दुकानातून मोड आणण्यास सांगितले. त्यावेळी ती महिला लगबगीने उतरुन धावतच दुकानाजवळ गेली व तीने पुन्हा परत येऊन वाहकास सुट्टे पैसे परत केले. या घटनेच्यावेळी ती तरुण मुलगी निर्विकार चेहऱ्याने उभी होती. ती एक प्रकारे सध्याच्या तरुण-तरुणींच्या एका विशाल समूहाची प्रतिनिधी आहे, असे डॉ. साळुंखे यांना वाटले व त्यामुळेच त्यांना काळजी वाटू लागली.

डॉ. साळुंखे यांच्या मते, त्या तरुण, ऊर्जावान मुलीने स्वत: पुढे होऊन चपळाईने तो व्यवहार पूर्ण करावयास हवा होता. किंबहुना आईनेही मुलीवर जबाबदारी टाकून तिला सक्षम करावयास हवे होते. सध्याच्या नव्या पिढ्यांची व्यक्तिमत्वं खुरटण्यामागचं एक महत्त्वाचं कारण या घटनेतून व्यक्त झाल्याचं डॉ. साळुंखे यांचे निरीक्षण आहे. जबाबदाऱ्या स्वीकारल्याशिवाय, चूकत-शिकत गेल्याशिवाय, जीवनात नाविन्याच्या ओढीनं सहभागी झाल्याशिवाय कुणाचं तरी जीवन सर्वार्थांनी आणि सर्वांगानी फुलू शकेल काय? असा प्रश्न डॉ. साळुंखे यांनी उपस्थित केला आहे. मोठ्या व्यक्तींनी लहानांवर विश्वासाने जबाबदाऱ्या टाकल्या पाहिजेत आणि लहान व्यक्तींनी सळसळत्या उत्साहानं, जिज्ञासेनं, उत्कंठेने जबाबदाऱ्या स्वीकारल्या पाहिजेत. आपल्या नव्या पिढ्यांची प्रतिभा विविध अंगांनी फुलून येण्याच्या दृष्टीनं हा एक फार महत्त्वाचा घटक आहे, असे डॉ. साळुंखे म्हणतात.

### २.३.४ सर, आय नॉट लाईक !

चेन्नईतील चिन्नू नावाच्या एका मुलासंदर्भातील एक हृदयस्पर्शी आठवण डॉ. साळुंखे यांनी सांगितली आहे. सन २००१ साली चेन्नईतील एका विख्यात शिक्षण संस्थेच्या अतिथिगृहात डॉ. साळुंखे यांचे काही दिवस वास्तव्य होते. तेथील शांत, प्रसन्न वातावरणात, त्यांनी 'तुझ्यासह आणि तुझ्याविना' हे त्यांच्या

स्मृतिशेष पत्नींच्या आठवणीवरील पुस्तक लिहिले. या काळात तेथील अतिथिगृहातील कामांसाठी चिन्नू या टोपणनावाचा एक मुलगा होता. त्याला तमिळशिवाय दुसरी भाषा येत नव्हती. त्याला इंग्रजी-हिंदीतील पाच-पंचवीस शब्द येत होते. त्याचे व्यक्तिमत्व अत्यंत प्रसन्न व हसतमुख होते. शब्दावाचून तो खूप काही बोलायचा.

एकदा डॉ. साळुंखे यांच्या खोलीतील स्नानगृहाच्या टाकीतलं पाणी संपलं, म्हणून ते त्याला सांगायला गेले. त्यावेळी तो जेवण करीत होता. जेवण झाल्यावर बादलीभर पाणी दे, असे त्यांनी त्याला सांगितले. पण जेवण अर्धवट ठेवून त्याने आधी पाणी आणून दिले. त्याच्या या कृतीने डॉ. साळुंखे आत्मीयतेने भारावून गेले.

परतीच्या प्रवासास निघताना डॉ. साळुंखे यांनी त्या मुलांच्या हातावर काही रक्कम ठेवण्याचा प्रयत्न केला. पण त्याने नम्रपणे नकार दिला. फारच आग्रह केल्यावर तो म्हणाला, 'सर, आय नॉट लाईक!'. त्याच्या त्या निष्कपट भावनेमागे एक सुंदर तत्त्वज्ञानही होतं, असं डॉ. साळुंखे यांना वाटते.

या घटनेनं १९६६ साली घडलेल्या पूर्वीच्या एका घटनेची आठवण डॉ. साळुंखे यांना झाली. काही काळ डॉ. साळुंखे शिक्षणासाठी बंगालमधील रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतनला गेले होते. परंतु काही कारणानं ते तिथं राहू शकले नाहीत. तेथून परत येताना ते अजिंठ्याला गेले. अंजिठ्याच्या प्रवासात त्यांची एका जपानी तरुणाबरोबर मैत्री झाली. एका हॉटेलात चहा घेतल्यावर डॉ. साळुंखे हे दोघांच्याही चहाचे बिल देऊ लागले. तेव्हा त्या जपानी तरुणाने ठाम विरोध केला आणि स्वत:चे बिल स्वत: दिले. 'माझ्या चहाचं बिल दुसऱ्यानं देणं माझ्या जपानी लोकांना आवडणार नाही' असं त्याचं वाक्य होतं.

वरील दोन्ही घटनांमध्ये 'स्व' चा विकास आपल्या श्रमातून, प्रयत्नातून, प्रामाणिकपणे व नीतीने करावयाचा. दुसऱ्यांकडून घेऊन आपण वाढायचं नाही. चार पैसे वाचविण्यासाठी वा मिळवण्यासाठी 'स्व'ला डाग लावून घ्यायचा नाही, हा खूप मोठा धडा मिळतो. सर्वसामान्य माणसंसुद्धा अनेकदा आपल्याला केवढा उज्ज्वल प्रकाश आणि किती निर्मळ दृष्टी देऊन जातात, हे वरील तरुणांच्या उदाहरणांवरुन डॉ. साळुंखे यांनी स्पष्ट केले आहे.

### २.३.५ पत्रिकेतल्या कालसर्प योगाला डॉक्टरनं भ्यावं?

आपल्या देशातील उच्च शिक्षितांमधील वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव, अंधश्रद्धा, रुढी-परंपरांचा प्रभाव वगैरेंवर भेदक प्रकाश टाकणारा हा लेख वाचकांना अंतर्मुख करतो.

एका डॉक्टर झालेल्या मुलाने लग्नासाठी डॉक्टर मुलगी पसंत केली. पुढे काही काळाने वर पक्षाने मुलीच्या पत्रिकेत कालसर्पयोग आहे असे म्हणून नकार दिला. विज्ञान विद्याशाखेचे, वैद्यकशास्त्राचे उच्चशिक्षण घेतलेल्या डॉक्टर मुलाचे सर्व ज्ञान पत्रिकेतल्या एका शब्दापुढं लोळागोळा होऊन गेलं. उच्चशिक्षित डॉक्टर मुलाने पत्रिकेतील शब्दाला भिऊन जुळणारं नातं तोडावं हे धक्कादायक होतं. हा डॉक्टर वैद्यकीय व्यवसाय कसा करणार? खरंतर वैद्यकशास्त्राच्या ज्ञानामुळं त्याला सत्याच भान यायला हवं होतं.

नवी दृष्टी प्राप्त व्हायला हवी होती. उच्चशिक्षित व्यक्तीही अशा किरकोळ शब्दांना बळी पडत असतील तर देशाच्या भवितव्याविषयी चिंता वाटल्याशिवाय कशी राहील? असा प्रश्न डॉ. साळुंखे यांनी उपस्थित केला आहे.

समाजसुधारक, वैज्ञानिक, संत वगैरेंनी अंधश्रद्धांवर हल्ले करुनही आपल्या समाजात अजून कितीतरी प्रकारचे भ्रम आहेत. या अंधश्रद्धांपायी प्रचंड आर्थिक नुकसान, भयगंड, शोषण व आनंदाच्या, समृद्धीच्या उत्तम संधी गमावणं, असे असंख्य प्रकार घडत आहेत. ज्यांनी समाजाला या साऱ्या अंधश्रद्धांतून बाहेर काढण्याइतकं ज्ञान आणि सामर्थ्य प्राप्त केलं आहे. तेच त्या अंधाराला भिऊ लागले, त्यांच्यापुढं शरणागती पत्करु लागले तर या देशात प्रकाशाचा विजय कसा आणि केव्हा होईल? असा अस्वस्थ व अंतर्मुख करावयास लावणारा प्रश्न विचारला आहे. कार्यकारणभाव, वैज्ञानिक दृष्टिकोन यांची गरज अधोरेखित केली आहे. प्रत्येकाने या लेखातून धडा घ्यावा. पारंपरिक विचार व अंधश्रद्धांमधून बाहेर पडून वैज्ञानिक विचार अंगिकारावा. त्यामुळे जीवनात आनंदाचे असंख्य क्षण वाट्यास येतील, असा विचार या लेखामध्ये मांडलेला आहे.

### २.३.६ तीन कुटुंबांची स्वागतार्ह परिवर्तनशीलता

मार्च, २००२ मध्ये सांगली इथं झालेल्या परिवर्तन साहित्य संमेलनामध्ये एका दांपत्याचा डॉ. साळुंखे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अविवाहित तरुण आणि विधवा तरूणी यांनी परस्परांशी विवाह करुन परिवर्तनाची एक तेजस्वी ज्योत प्रदीप्त केली होती. मुलाचे कुटुंब, मुलीचे माहेरचे कुटुंब व सासरचे कुटुंब या तिन्ही कुटुंबांच्या संमतीने आणि त्यांच्या उपस्थितीत हा विवाह सोहळा पार पडला होता. त्याचा गौरव या लेखामध्ये केला आहे.

मुलगा गरीबीतून, कष्ट करुन शिकला. इंग्रजी विषयामध्ये एम. ए. बी. एड्. झाला. म. फुल्यांच्या विचाराने प्रभावित झाला. आपण फुल्यांच्या विचारांच्या दिशेने एक तरी पाऊल टाकण्याची प्रत्यक्ष कृती केली पाहिजे, असे त्याला वाटू लागले. त्याने विधवेशी विवाह करुन त्या दिशेने पाऊल टाकले. मुलगीही बी. एस्सी., बी.एड् झालेली होती. लग्नानंतर थोडयाच दिवसात तिच्या पतीचे निधन झाले. या घटनेनंतर काही मित्रांच्या माहितीवरुन त्या दोघांचा विवाह झाला. कालबाह्य असूनही अजून व्यवहारात प्रचलित असलेल्या एका रुढीच्या विरोधात जाऊन त्यांनी विवाह केला. लग्नापूर्वी पत्रिका, ज्योतिष अशा कोणत्याही बाबीस थारा दिला नाही. मुलीच्या माहेरच्यांनी व सासरच्यांनीही तिच्या पुनर्विवाहास मान्यता दिली. मुलाच्या आई वडिलांनाही स्वत:मध्ये परिवर्तन केले. माणूस स्वत:ला किती उंचीवर नेऊ शकतो, याचं हे एक उदात्त उदाहरण होय असे डॉ. साळुंखे म्हणतात.

अनेकदा विधवेचं जीवन म्हणजे जिवंतपणी आगीत होरपळण्याचा प्रकार असतो. तिला अशुभ मानून अपमानित केलं जातं. एकाकीपणाचं दु:ख भोगत, दु:खाच्या वणव्यात क्षणाक्षणाला होरपळावं लागतं. सामान्यत: अशी परिस्थिती भोवताली असताना त्या तीन कुटुंबानी एका दु:खी जीवाच्या भोवतीचा वणवा विझवला. त्या जीवाला पुन्हा मोहरण्याची संधी दिली. खरी प्रतिष्ठा, खरी अब्रू खोट्या रुढींमध्ये नसते, तर

आपल्या माणसाचं दु:ख जाणण्याइतकी आणि ते दूर करण्याइतकी सहृदयता दाखवण्यामुळचं माणूस म्हणून आपली प्रतिमा वाढते. असा उमदा विचार डॉ. साळुंखे यांनी मांडला आहे. या घटनेचे अनुकरण इतरत्रही होत जावे, अशी अपेक्षा आहे.

**२.३.७ भाषेतली पुरुषप्रधानता बदलणं, हे एक आव्हानच !**

आपल्या भाषिक व्यवहारामधून समाज-मानसशास्त्रीय तथ्ये कशी अभिव्यक्त होत असतात, याचा एक अनुभव डॉ. आ. ह. साळुंखे यांनी प्रस्तुत लेखामध्ये नोंदविला आहे.

एकदा महाविद्यालयीन वर्गामध्ये मराठी वाक्याचे संस्कृतमध्ये भाषांतर कसं करावं, हे विद्यार्थिनींना डॉ. आ. ह. साळुंखे शिकवित होते. प्रत्येक विद्यार्थिनीनं एक-एक मराठी वाक्य सांगावं असे डॉ. साळुंखे यांनी सूचवलं. त्यानंतर विद्यार्थिनींच्या मदतीनेच त्याचे संस्कृत भाषांतर करायचे, असा त्यांचा विचार होता. सर्व मुलींनी एक-एक मराठी वाक्य सांगितलं. त्यानंतर त्यांच्या लक्षात आलं की प्रत्येक वाक्याचा कर्ता पुल्लिंगी होता. स्त्रीलिंगी व्यक्तीला कर्ता बनवून वाक्य बनवावं, असं एकाही मुलीला वाटलं नाही. या धक्कादायक घटनेमागच्या समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय कारणांची चर्चा डॉ. साळुंखे यांनी केली आहे.

स्थूलमानानं 'कर्तृत्वाचा' संबंध पुरुषाकडे जोडण्याची प्रवृत्ती आपल्या समाजामध्ये आहे. 'वाक्याचा कर्ता' असं म्हणतानाही 'कर्ता' हे स्त्रीलिंगी रुप संस्कृतमध्ये फारसं वापरलं जात नाही. पुल्लिंगी शब्दातून स्त्री लिंगी शब्द सूचित होतो, असं मानलं जातं. आपली ही प्रवृत्ती आपल्या भाषेमध्ये, वाक्यरचनेमध्ये, शब्दांमध्ये प्रतिबिंबित होत असते. भाषा कानांवर पडायला लागल्यापासून सूक्ष्मपणानं, गुप्तरूपानं, अजाणता पुरुषप्रधानतेचे संस्कार आपल्या मनावर होत असतात. ते आपल्या अंतर्मनात जाऊन खोलवर रुजून बसतात. आपल्या व्यक्तिमत्त्वाचा, आपल्या विचारप्रक्रियेचा, आपल्या चिंतनाचा अविभाज्य घटक बनून जातात, हे पुरुषांप्रमाणे स्त्रियांच्या बाबतीतही घडतं.

भाषेमधली पुरुषप्रधानता फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. 'धर्म, अर्थ, काम, मोक्ष' यांना 'पुरुषार्थ' म्हटलं जातं. याचा शब्दश: अर्थ 'पुरुषाच्या जीवनाची उद्दिष्टे' असा होतो आणि 'स्त्रीच्या जीवनाची उद्दिष्ट'हा अर्थ दुय्यम मार्गाने घ्यावा लागतो. 'मातपितरौ'असा द्वंद समास करताना विकल्पानं माता हा शब्द वगळून नुसतं 'पितरौ'हे रूप वापरलं तरी चालेल, असा व्याकरणाचा नियम आहे. इंग्रजीतील Parents या शब्दामधील Parent हा पितृवाचक शब्द आहे. त्याचं अनेकवचन करुन त्यातच आईचाही अंतर्भाव होतो, असं त्यामध्ये मानलेलं आहे.

भाषेमधील ही पुरुषप्रधानता कमी करणं, स्त्रीत्वाचे निर्देश वाढवणं आणि एक सम्यक विवेकी उभयप्रधानता आणून संतूलन निर्माण करणं, हे समतावादी लोकांपुढचं मोठं आव्हान आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रातल्या घटनांचा आविष्कार भाषेच्या माध्यमातून होत असतो. अंतर्मनापर्यंत संस्कार करण्याचे कार्य भाषा करीत असते. म्हणून याबाबतीत जागरूक राहून परिवर्तनशील भाषा व्यवहार करण्याची गरज असल्याचे डॉ. साळुंखे यांनी म्हटले आहे. गजराबाई साबळे या जुन्या तिसरी इयत्ता शिकलेल्या माऊलीने 'बाळा जो जो

रे' या पाळण्यात प्रसंगानुसार बदल करून 'बाळा जो जो गं' असं केलं होतं. भाषेमधील विषमता दूर करण्याचा हा एक मार्ग आहे, असे डॉ. साळुंखे यांनी नोंदविले आहे.

## २.३.८ पत्नी गुलाम म्हणून हवी, की मैत्रीण म्हणून?

पत्नीकडे पाहण्याच्या पुरुषी मानसिकतेचा वेध डॉ. साळुंखे यांनी या लेखामध्ये घेतला आहे. या संदर्भातील दोन अनुभवांचे कथन त्यांनी केले आहे.

औरंगाबादमधील एका शिक्षणसंस्थेला त्यांनी काही मित्रांसह भेट दिली. त्यावेळी संस्थेच्या एका पदाधिकाऱ्यांनी चर्चेच्या ओघात आपल्या मुलाच्या गुणवत्तेविषयी मोठ्या अभिमानाने सांगितले. ते ऐकून एकजण चेष्टेने त्यांना म्हणाला, ''मुलगा इतका बुद्धिमान आहे, याचा अर्थ तो वहिनींवर गेलेला दिसतो!'' या विधानावर संबंधित पदाधिकाऱ्यांनी अत्यंत संतापाने, तिखट व आक्रमक प्रतिक्रिया दिली. स्वत:च्या पत्नीचाही उपमर्द केला. या घटनेवर डॉ. साळुंखे असे म्हणतात की, आपली पत्नी आपल्यापेक्षा बुद्धिमान असल्याची केवळ थट्टेमध्ये मांडलेली कल्पनाही त्या गृहस्थांना सहन झाली नाही. पत्नीच्या गौरवामुळे आपल्याला काहीतरी कमीपणा येतोय, असं त्यांना वाटलं. खरंतरं उत्कट प्रेम करणाऱ्या आपल्या पत्नीची सगळी गुणवत्ता म्हणजे एका परीनं आपल्याच बुद्धीचं वैभव आहे. असं त्यांना वाटायला हवं होतं.

यानंतर उद्‌गीरमधील एका महाविद्यालयातील एक प्रसंग त्यांनी सांगितला आहे. डॉ. साळुंखे यांनी 'धर्म आणि स्त्री' या विषयावर विद्यार्थ्यांपुढं व्याख्यान दिले व समारोप करताना ते म्हणाले, ''स्त्रियांना समतेनं वागवलं, त्यांना स्वातंत्र्य दिलं. तर आपला संसार मोडेल, आपली कुटुंब व्यवस्था ढासळेल, असं काही पुरुषांना वाटतं.'' या वाक्याच्या उच्चाराबरोबर बऱ्याच विद्यार्थ्यांनी एकसुरात 'बरोबर आहे', असं म्हटलं. म्हणजे व्याख्यानाचा त्यांच्यावर विशेष परिणाम झाला नव्हता.

यानंतर पुढे डॉ. साळुंखे विद्यार्थ्यांना उद्देशून म्हणाले की, मी तुमच्यापुढे दोन पर्याय ठेवतो. ''पहिल्या प्रकारची पत्नी ही स्वातंत्र्य नसलेली, समतेचा हक्क न मागणारी, 'तुमच्या मुठीत राहणारी' अशी असेल. त्यामुळं तिचं व्यक्तिमत्त्व खुरटलेलं असल्यामुळे तुम्ही तिच्याशी खराखुरा संवाद साधू शकणार नाही. एखाद्या गुलामाला राबवून घ्यावं, त्याप्रमाणे तुम्ही तिच्या सहवासानं मालकी हक्काचं सुख मिळवू शकाल. दुसरी स्त्री स्वातंत्र्याचा आनंद घेणारी आहे. तिचं व्यक्तिमत्त्व फुललेलं आहे, त्यामुळे ती तुमचंही व्यक्तिमत्त्व फुलवते. ती तुमच्या मुठीत राहणारी गुलाम नाही, पण तुमच्या हृदयाशी सुसंवाद साधणारी मैत्रीण आहे.'' यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून विचारले की, ''तुम्हांला तुमच्या मुठीत राहणारी गुलाम स्त्री पत्नी म्हणून हवी काय?'' यावर गंभीर होऊन विद्यार्थी गप्प बसले. मग, त्यांनी विचारलं, ''फुललेल्या व्यक्तिमत्त्वाची मैत्रीण तुम्हांला पत्नी म्हणून आवडेल काय?'' याबरोबरच सर्व विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला.

पत्नी ही सखी, मैत्रीण म्हणून आपली सहचारिका असावी, हा विचार अत्यंत प्रभावीपणे डॉ. साळुंखे यांनी मांडला आहे.

### २.३.९ माझ्या लेखना–भाषणांमुळं माझ्यातच अधिक परिवर्तन झालं!

डॉ. आ. ह. साळुंखे यांनी आपल्या विचारांचा प्रभाव आपल्या आचारांवर कसा पडतो, हे पुढील दोन अनुभवांतून स्पष्ट केले आहे.

जळगावमध्ये त्यांची चार्वाक दर्शनावर व्याख्याने झाली. पारलौकीक स्वर्ग, नरक इ. प्रकारच्या भ्रामक गोष्टीमागं धावण्याऐवजी या पृथ्वीवरचं वास्तव जीवन कष्टपूर्वक निकोप आनंदानं जगावे, हे चार्वाकांचे पायाभूत तत्त्व होते. 'गोड भाषा वा गोड बोलणारा' या अर्थाचं 'चार्वाक' हे नाव त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानाला दिलं होतं. तेव्हा आपण देखील जगताना, परिवर्तन करताना आपली भाषा शक्यतो गोड ठेवावी, अशा आशयाचे विचार डॉ. साळुंखे यांनी मांडले. त्यानंतर एका तरुणाने डॉ. साळुंखे यांची भेट घेतली. आपली आई अंधश्रद्धा मानणारी असून तिला सांगूनही परिवर्तन होत नाही, म्हणून आपण कडवटपणे तिच्याशी बोलून प्रसंगी तिचा अवमान करायचो. परंतु यापुढे आई बरोबरचे मतभेद कडवटपणे व्यक्त करणार नाही, असे सांगितले. पुढे काही दिवसांनी भेटल्यावर त्याने आपल्या बोलण्यात खरोखरच परिवर्तन झाल्याचं सांगितलं. डॉ. साळुंखे यांच्या भाषणांचा–विचारांचा श्रोत्यांवरील हा विधायक परिणाम होता.

डॉ. साळुंखे यांनी आपल्या विचारांमुळे, चिंतनामुळे, व्याख्यानामुळे स्वत:मध्येही झालेल्या बदलाचा अनुभव नोंदविला आहे. 'धर्म आणि स्त्री' या विषयावरील त्यांच्या व्याख्यानास एकदा त्यांच्या पत्नीही उपस्थित होत्या. भाषणाच्या ओघात ते म्हणाले की, ''एखाद्या दिवशी सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण केलेल्या बारीक सारीक अशा सर्व कामांची यादी करावी आणि आपल्या पत्नीनं केलेल्या अशाच सर्व कामांचीही यादी करावी, म्हणजे श्रमाचा बोजा कुणावर किती पडतो हे तुलनेनं स्पष्ट होईल'' व्याख्यानानंतर त्या रात्री त्यांनी स्वत:ही उभयतांच्या दिवसभरातील कामांचा हिशोब केला. या हिशोबानं त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन बदलला. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या आचरणात पडले. दुसऱ्या दिवसापासून त्यांनी शक्य तेवढ्या कामात पत्नीस मदत करण्यात सुरुवात केली. घरातील स्त्रियांच्या कामाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन बदलला.

आपल्या विचारांचे आपणच तटस्थपणे मूल्यमापन केले तर आपले आचार, दृष्टिकोन बदलू शकतात, हे प्रभावीपणे इथे पटवून दिले आहे.

### २.३.१० मानवी मनाची निर्मितिक्षमता थक्क करणारी आहे!

डॉ. आ. ह. साळुंखे यांनी एके रात्री स्वप्नामध्ये त्यांच्या स्मृतिशेष पत्नीला पाहिलं. स्वप्नातील पत्नीची मुद्रा काही वेगळीच होती. आयुष्यभरात त्यांनी पत्नीच्या जितक्या प्रसन्नमुद्रा पाहिल्या होत्या, त्या सर्व मुद्रांच्या गाभ्याचं सार एकवटून ही देखणी मुद्रा मनात तयार झाली असावी, असे त्यांनी लिहिले आहे.

स्वप्नांच्या अनुषंगाने त्यांनी मानवी मनाच्या निर्मितिक्षमतेवर भाष्य केले आहे. वास्तवापेक्षाही हृद्य अशा विश्वाची निर्मिती करण्याची मानवी क्षमता आहे, असे ते म्हणतात. स्वप्नांची उकल करण्याचा एक दृष्टिकोनही या लेखातून व्यक्त झाला आहे.

## २.४ समारोप

डॉ. आ. ह. साळुंखे यांनी त्यांच्या अनुभवांचे निवेदन करीत मानवी जीवनातील आनंद आणि सौंदर्य वृद्धिंगत करण्याची शैली सांगितली आहे. पाणिनीसारखी ज्ञाननिष्ठा, झपाटलेपण, यांचा अंश जरी आपल्या जीवनात उतरला तरी आपण अधिक उंच होऊ, असा उन्नत ज्ञानमार्ग त्यांनी कथन केला आहे. एक-एक शब्द जाणणं, त्याच्या अर्थच्छटा समजून घेणं, यातून भाषिक व्यक्तिमत्व समृद्ध करण्याची रीत मांडली आहे. व्यावहारिक अनुभव घेण्याचं महत्त्व, जिज्ञासेने जबाबदाऱ्या स्वीकारण्याचे महत्त्वही त्यांनी सांगितले आहे. कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता व नैतिकतेशी, तत्त्वांशी तडजोड न करता आपल्या 'स्व' चे आविष्करण करावे, असा प्रेरणादायी विचार मांडला आहे. कार्यकारणभाव, वैज्ञानिक दृष्टी यांची नितांत गरज अधोरेखित केली आहे. विधवा पुनर्विवाहासारखा मानव मुक्तीचा कृतिशील आचार करून समाज परिवर्तनाची पहाट कशी उगवते, यावरही भाष्य केले आहे. भाषेतील पुरुषप्रधातेची कारणमीमांसा करीत, स्त्री-पुरुष समतेच्या जगासाठी भाषिक व्यवहारातील पुरुषप्रधानता बदलण्याची गरज व दिशा स्पष्ट केली आहे. पत्नी ही गुलाम म्हणून हवी, की मैत्रीण म्हणून याचे अत्यंत परिणामकारक विश्लेषण केले आहे. आपल्या विचारांनी आचारांमध्ये कसे परिवर्तन घडते, याची एक मूलगामी प्रक्रिया उलगडली आहे. स्वप्नमीमांसा करीत मानवी मनाची थक्क करणारी निर्मितिक्षमता विशद केली आहे. या सर्व लेखांमधून तरुणांना व्यापक, उन्नत, उमदा, ऊर्जावान बनविणारा चैतन्यदायी विचार प्रवाह व्यक्त होतो. परिवर्तनाची शक्ती व दिशा या विचारांमध्ये आहे.

## २.५ प्रश्नोत्तरे

### २.५.१ बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न

१) पाणिनीचा कोणता ग्रंथ जगद्विख्यात आहे?

अ) अर्थशास्त्र  ब) अष्टाध्यायी  क) लीलावती  ड) गाथासप्तशती

२) डॉ. आ. ह. साळुंखे यांना एक जपानी तरुण कोठे भेटला?

अ) शांतिनिकेतन  ब) चेन्नई  क) टोकीयो  ड) अंजिठा

३) भाषेमधील कोणती गोष्ट बदलण्याची आवश्यकता डॉ. आ. ह. साळुंखे यांनी व्यक्त केली आहे?

अ) अलंकार  ब) संस्कृतप्रचुरता  क) पुरुषप्रधानता  ड) काठिण्य

४) 'चार्वाक' या नावाचा एक अर्थ कोणता होतो?

अ) गोड भाषा/गोड बोलणारा  ब) अनेकांन्तवाद

क) अद्वैत  ड) चालणारा

५) मानवी मनाची कोणती बाब थक्क करणारी आहे?

अ) निर्मितिक्षमता ब) विकारवशता क) संचारक्षमता ड) लालसा

**उत्तरे :** १) अष्टाध्यायी २) अंजिठा ३) पुरुषप्रधानता

४) गोड भाषा/गोड बोलणारा ५) निर्मितिक्षमता

### २.५.२ दीर्घोत्तरी प्रश्न

'एक-एक नवा शब्द.....' व 'भाषेतली पुरुषप्रधानता' या लेखांमधील भाषाविषयक चिंतन तुमच्या शब्दांत लिहा.

**उत्तर :** मुद्दा. क्र. २.३.२ व २.३.७ च्या आशयाच्या आधारे उत्तर तयार करा.

### २.५.३ लघुत्तरी प्रश्न

'पाणिनीचा मृत्यूही....' या लेखामधील ज्ञाननिष्ठेचे विवेचन करा.

**उत्तर :** मुद्दा. क्र. २.३.१ च्या आशयाच्या आधारे उत्तर तयार करा.

## २.६ सरावासाठी प्रश्न

### २.६.१ लघुत्तरी प्रश्न

'पत्रिकेतल्या कालसर्प योगाला....' व 'तीन कुटुंबांची.... या लेखांमधील परिवर्तनवादी दृष्टिकोनाची चिकित्सा करा.

### २.६.२ दीर्घोत्तरी प्रश्न

'पत्नी गुलाम म्हणून हवी, की मैत्रीण म्हणून' या लेखातील आशयाचे तुमच्या शब्दात विश्लेषण करा.

## २.७ उपक्रम

१. तुमच्या जीवनातील वैशिष्ट्यपूर्ण अनुभवांच्या आधारे ललितलेखन करा.

## २.८ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

१. साळुंखे आ. ह. - तुझ्यासह आणि तुझ्याविना, लोकायत प्रकाशन, सातारा

२. साळुंखे आ. ह. - त्यांना सावलीत वाढवू नका, लोकायत प्रकाशन, सातारा

३. साळुंखे आ. ह. - जीवनाची लय वेदनेत, लोकायत प्रकाशन, सातारा

४. साळुंखे आ. ह. - अंधाराचे बुरूज ढासळतील!, लोकायत प्रकाशन, सातारा

५. साळुंखे आ. ह. - विद्रोही तुकाराम, लोकायत प्रकाशन, सातारा

❑❑❑